

Date : /

## उत्सव तेजाचा (कोजागिरी)

शरदाचे हे स्निग्ध चांदणे, जणू वर्षाव अमृताचा ।
निसर्ग धरती, करीती साजरा, हा उत्सव तेजाचा .....॥ धृ ॥
मधोमधी हा शुभ्र चांदवा, भोवती, तारकांचे थवे ।
रास खेळतो कृष्ण सखा जणू, गोपगोपिका सवे ॥
कानी घुमतो, रुंजी घालतो, स्वर मंजुळ मुरलीचा ।
निसर्ग धरती करीती साजरा.............. ॥१॥
पानोपानी जणू विखुरला, हा मोत्याचा चूर ।
रातराणीच्या कळ्या जाहल्या उमलण्या आतूर ॥
त्यांच्यासंगे खेळ चालला, धुंद चंद्र किरणांचा ।
निसर्ग धरती करीती साजरा .............. ॥२॥
जळात खेळे चंद्रबिंब ते लाटावर हिंदोळी ।
तरंगरूपे अती ममतेने, नदी तया सांभाळी ॥
अंकावरती बाळ खेळते, बहर वात्सल्याचा ।
निसर्ग धरती करीती साजरा ............. ॥३॥
पाऊस किरणांचा झेलूनी, हे डोंगर माथे सजले ।
शुभ्र वस्त्र लेवूनी जणू कुणी, दरबारी बसले ॥
रत्नजडीत सिंहासनी बैसला, राजा चंद्र तयांचा ।
निसर्ग धरीती करीती साजरा ............ ॥४॥
शीतल चंदन मधुर मंद हा परिसर सारा ।
हर्ष भराने ओलवी तयांना, हा मलयगिरीचा वारा ॥
रोम रोम रोमांचित करतो, हा स्पर्श गारव्याचा ।
निसर्ग धरती, करीती साजरा ............ ॥५॥
या रे या रे, सारे, मिळूनी घेऊ हा आनंद ।
हसू, बागडू, गाणी गाऊ, होऊनिया स्वच्छंद ॥
सुस्वर संगीत, स्वर्गीय ठेवा, हा अनुभव ब्रम्हानंदाचा ।
निसर्ग धरती, करीती साजरा हा उत्सव तेजाचा ॥

सौ. शोभा पांडे
9405438939